बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र.प्र.ले.(को)/एफपीपी /२३६६० दि.२१/१२/२०२१

विषय : बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेतून सेवानिवृत्त,स्वेच्छा निवृत्त,असमर्थ, मृत्यु पावलेल्या कामगार/कर्मचा-यांचे देय दावे तसेच कुटुंब निवृत्तीवेतन दावे निकाली काढताना होणा-या दिरंगाई बाबत

---

विषयांकित प्रकरणी प्रशासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार व परिपत्रक क्र. प्र.ले.(को)/एफ पीएन-१/ २९ दि.१६.१०.२०२० मधील निदेशानुसार निश्चित केलेल्या कार्यपद्धतीनुसार ज्या सेवानिवृत्त होणा-या कामगार /कर्मचारी यांचे निवृत्तीवेतनादी दावे परिपूर्ण व योग्य कागदपत्रांसह विहित वेळेत मानव संसाधन प्रणालीतून निवृत्तीवेतन विभागाला सादर केले जात आहेत त्या निवृत्तीपश्चातील सर्व दाव्यांचे एकत्रित अधिदान केले जात आहे. तथापि येथे असे आढळून येते की कामगार /कर्मचारी यांचे निवृत्तीवेतनादी दावे योग्य त्या कागदपत्रांसह विहित वेळेत सादर न झाल्यामुळे सदर निवृत्तीवेतन दाव्यांचे अधिदान प्रलंबित रहात आहे.

सदर प्रकरणी सबंधित कामगार /कर्मचारी बृहन्मुंबई महानगरपालिकेतील मान्यता प्राप्त कर्मचारी /कामगार संघटना तसेच मान.महापौर ,मान.अध्यक्ष स्थायी समिती ,मान.म.न.पा आयुक्त /मान.अतिरिक्त आयुक्त (शहर ) व मान.सह आयुक्त (सामान्य प्रशासन) यांजकडे वारंवार तक्रार अर्ज सादर करीत आहेत.

सदर बाबत प्राप्त होणा-या तक्रारीवरून असे निदर्शनास येते की सदर कामगार /कर्मचारी यांचे निवृत्तीवेतनादी दावे अर्धवट किंवा अपूर्ण कागदपत्रांसह मानव संसाधन प्रणालीमध्ये सादर होत आहेत.तसेच पर्यवेक्षीय स्तरावर योग्य त्या कागदपत्रांसह निवृत्तीवेतन दावे लक्षपूर्वक अपलोड केले जात नसल्यामुळे चुकांची पुनरावृत्ती होऊन दावे खाते/विभागाकडे परत त्रुटींची पूर्तता करण्यासाठी जातात व त्यामुळे सदर दाव्यांचे अधिदान प्रलंबित राहत आहे. परिणामी कामगार/कर्मचारी यांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत असून भविष्यात त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात याची कृपया नोंद घेऊन लक्षात घेऊन त्यांच्या दाव्याबाबत त्वरित योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

प्रसंगवशात,येथे असे नमूद करण्यात येते की कामगार संघटनांच्या वारंवार सादर होणा-या तक्रारींची दखल मान.अतिरिक्त आयुक्त (शहर ) यांनी घेतलेली असून नुकत्याच सर्व खातेप्रमुखांसोबत झालेल्या व्हिडीओ कॉन्फरन्समध्ये प्रलंबित निवृत्तीवेतन दावे त्वरित निकालात काढण्याबाबत त्यांनी सर्व सबंधिताना आदेश दिलेले आहेत.

अतएव, सर्व प्रलंबित प्रकरणाबाबत सबंधित खाते विभागाशी वैयक्तिक संपर्क साधून सर्व दावे कार्यान्वित करण्यात यावेत.निवृत्तीवेतन दाव्यासंदर्भातील सर्व बाबींची जसे गृह कर्ज,हमिदारी,सेवाभिलेख नोंदी,कायमत्व,सहावा वेतन आयोग पडताळणी,म.न.पा सेवानिवासस्थान सबंधित कागदपत्रे,जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र,पडताळलेले ना हरकत प्रमाणपत्र,म्युनिसिपल बँक तसेच इतर वसुली,चौकशी,निलंबन कालावधी,stop gap नियुक्ती,तांत्रिक खंड वसुली,सिंगल फोटो असल्यास fpp/०८ परिपत्रकानुसार कार्यवाही,लेखा अधिकारी( आय बी ) विभागाचे अभिप्राय, marriage /remairrage बाबत चे योग्य अभिप्राय, annexture -३, घ.क.व्य.खात्यातील कामगारांची गृहीत धरावयाची ५०% daily wages ची सेवा व सर्वात महत्वाचे PA 40 मध्ये Main Bank option ला पेन्शन बँक अपडेट करणे,payment method मध्ये NEFT करणे,कर्मचा-याचे नाव bank option form व पगारपावती नुसार तंतोतंत इंग्रजी मध्ये नमूद करणे, सदर बँक पेन्शन साठी अनुज्ञेय बँक आहे का याची खात्री,बँक option form व व ecs form या दोन्ही वरील नाव,

account no.,micr,ifsc code इत्यादीबाबत संपूर्ण खात्री करून दावे अपलोड करण्यात यावेत. तसेच पुढील सहा महिन्यात सेवानिवृत्त होणा-या कामगार /कर्मचारी यांचे निवृत्तीवेतन दावे पडताळणी व अधिदानासाठी निवृत्तीवेतनविभागाला कृपया त्वरित सादर करण्याबाबत पुनः सूचित करण्यात येत आहे. तसेच खातेप्रमुख स्तरावर परिपत्रक क्रं प्र.ले.(को)/एफपीपी /२७ दि.०७.१२.२००७ मधील निदेशानुसार पेन्शन अदालत आयोजित करून प्रलंबित दाव्यांचा सर्वकष आढावा घेऊन विहित वेळेत परिपूर्ण कागदपत्रांसह निवृत्तीवेतन दावे सादर न करणा-या सबंधित कर्मचारी /अधिकारी यांच्यावर अतिरिक्त आयुक्त (प.उपनगरे) यांच्या क्रं AMC/WS/3228/VIP दि.३०.११.२०१६ मधील निदेशानुसार जबाबदारी निश्चित करण्यात यावी. त्यामुळे निवृत्तीवेतनादी दाव्यांच्या अधिदानाबाबत होणा-या दिरंगाई बद्दल ठोस व त्वरित कार्यवाही होऊ शकेल.

कृपया सदर कामकाज तातडीचे समजावे.

SSKawade
20-12-2021
प्रमुख लेखापाल (कोषागार)

सर्व खाते प्रमुख /विभाग प्रमुख /सहाय्यक आयुक्त /रुग्णालय प्रमुख
प्रमुख लेखापाल /उपप्रमुख लेखापाल /सर्व लेखाअधिकारी
cc to : Hon jtmc gad ,all zonal dmc